# कारभारणींची सत्ता: भागिदारीची आस

## राज्य महिला धोरण: तीन दशकांचा आढावा




लेखन

**भिम रासकर**

यशवंतराव चव्हाण सेंटर
विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा

सकाळ

*पहिल्या महिला धोरणानंतर लगोलग झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण मिळाले. पुढे महाराष्ट्रात ते ५० टक्के झाले. परंतु आजही त्यांना या राजकीय सत्तेचा वापर स्वतंत्रपणे करता येत नाही. त्यांच्या वाटेवर कुटुंबापासूनच अडचणींची सुरुवात होते. निर्णय घेताना समाज, राजकीय पक्ष, प्रशासन अशा प्रत्येक टप्प्यांवर त्यांना संघर्ष करावा लागतो. त्यांचे राजकीय सक्षमीकरण करण्याच्या मार्गात नेमके कोणते अडथळे आहेत, आणि त्यावर कसा मार्ग काढता येईल, याचा विचार महिला धोरणाच्या माध्यमातून झाला पाहिजे. आजवरच्या महिला धोरणांनी महिलांना राजकीय हक्क देण्यासंदर्भात नेमकी काय भूमिका बजावली, याचा ऊहापोह आणि आगामी धोरणाकडून नेमक्या काय अपेक्षा आहेत, याची सविस्तर चर्चा करणारा लेख.*

महाराष्ट्रातील महिला चळवळीला डबल लॉटरी लागली, ती १९९३-९४ मध्ये! या वर्षी देशातील पहिले महिला धोरण महाराष्ट्राने तयार केले आणि याच भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामपंचायतीला गाव- संसदेचा दर्जा मिळाला. गाव विकासाची दिशा व धोरण ठरवण्याची जबाबदारी, तसेच व्यक्तिगत विकासाच्या योजनांच्या अंमलबजावणीच्या निर्णयप्रक्रियेत ग्रामस्थांचा सहभाग अनिवार्य झाला. असे असले तरी रूढी-परंपरांमुळे गावातील गरीब, वंचित व महिला ग्रामपंचायतीत जाण्याचे टाळतात, असे वास्तव दिसून आल्याने पुढे १९९६ मध्ये आदिवासींकरिता विशेष पंचायत राज विस्तार ( PESA) कायदाही बनला !

महिलांसोबत पंचायत राजमध्ये काम करत असताना महिला धोरणातील १९९४ च्या अकराव्या प्रकरणावर आधारित पंचायत व्यवस्थेला 'सप्तव्याधी' जडल्याचे दिसते. युरोपीयन युनियनचा २०१५ चा एक विशेष अहवाल वाचला होता. त्यातही याविषयी नेमके लिहिले आहे. महिला धोरणातील मूळ हेतूला या 'आजारांनी' खो दिला आहे.

## पंचायत राजव्यवस्थेचे आजचे चित्र

### अपुरा लोकसहभाग

आज गावात संस्था, संघटना, शासन व अनेक अभियाने काम करत आहेत. मात्र, ग्रामस्थ सोडून बाहेरील लोकांची भागीदारी वाढत आहे. गावातील ग्रामस्थांचा व खासकरून महिलांचा विकासातील प्रत्यक्ष सहभाग कसा वाढवावा, ही गंभीर समस्या आहे. महिला सभा समित्यांमधील महिलांना ५० टक्के आरक्षण व १० टक्के आरक्षित महिला बजेट यांचीही अंमलबजावणी आज इमानदारीने होत नाही.

### प्रस्थापित उच्चवर्गीयांचे वर्चस्व

गावात जे धनाढ्य लोक आहेत, त्यांना गावातील सर्व सत्ताकेंद्रे आपल्या हातात हवी आहेत; त्याचबरोबर शासन संस्थाही गावावरचे आपले वर्चस्व कमी करण्यास तयार नाही. स्थानिक स्वराज्य संस्था या स्वायत्त संस्था आहेत, असे म्हणतात; पण त्यांना पुरेशी मोकळीक दिली जात नाही. यामुळे आदिवासी, दलित व गरीब महिला सरपंचांना स्वतःचा आवाज राहत नाही.

### निर्णयाची संधी नाही

सर्व ग्रामपंचायतींना सरकारने आपली सेवाकेंद्रे बनवून ठेवली आहेत. निर्णय केंद्र म्हणून त्यांना भूमिका घेण्याची संधी दिली जात नाही. गाव स्तरावर केंद्र व राज्याच्या योजना व अभियानापुरती त्यांची आभासी स्वायत्तता टिकवून ठेवली जात आहे. गाव स्तरावरील ग्रामपंचायती या गाव-विकासाचे निर्णय केंद्र आहेत, असे सांगितले जाते; पण व्यवहारात ते दिसत नाही. गावातील कर्मचारी व निधी यांबाबत महिला आपल्या हिताचा निर्णयच घेऊ शकत नाहीत. उच्च अधिकाऱ्यांचे आदेश व ग्रामसेवकांची मनमानी, यांमुळे ग्रामपंचायती परावलंबी बनल्या आहेत. गाव काही विशेष निर्णय घेत नाही, नोकरशाहीच्या हातात गाव निर्णय सोपवले गेले आहेत.

### धोरणात्मक सुधारणा कागदावरच

सर्व महिला धोरणे आणि पंचायतींचा महिलांसंबंधी व्यवहार यांच्यामधील अंतराचे कुणाला काही सोयरसुतकच नाही. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतरही अनेक धोरणात्मक सुधारणा कागदावर झाल्याचे दिसते. पण, प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी किती झाली, याचे ऑडिट होत नाही. महिला धोरणेही छान आहेत.

परंतु त्याच्या अंमलजबावणीला पडलेले भगदाड कसे बुजवणार, हा गंभीर प्रश्न आहे. यातील नेमके अंतर समजले तर उपाय शोधता येतील; परंतु यातील अंतराचे ऑडिटही गंभीरपणे होत नाही.

## सर्वसमावेशकतेचा अभाव

संपूर्ण पंचायत राज व्यवस्थेत सर्वसमावेशकता दिसत नाही. दलित, अपंग, आदिवासी, अल्पसंख्य, भटके व विमुक्त समाज, महिला या सर्वांना विकासात तसेच निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणारी व्यावहारिक कार्यपद्धतीच दिसत नाही. गावातील जाती-जातींमधील व वर्गावर्गांमधील परस्पर सत्तासंबंध समजून घेतल्याविनाच विकासाच्या योजना बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. पंचायत स्तरावरील वंचित समूहांच्या व महिलांच्या दुय्यम स्थानांचे व शोषणाचे मर्म जाणून घेऊन पुढची दिशा व वाटचाल करावी लागेल. महिलांना व मुलींना किमान सुरक्षेची हमी मिळायला हवी.

## नवीन कल्पनांबाबत उदासीनता

सरकार व लोकप्रतिनिधींची नवीन शिकण्याची वृत्ती कमी आहे. गावाला, समाजाला पुढे घेऊन जाणारे नवे प्रयोग स्वीकारण्याची इच्छा व राजकीय ताकद दिसत नाही. समाजात आज अनेक प्रयोग संस्था, संघटना गावांच्या व स्व-मदतीने उभे राहत आहेत. ते स्वीकारायला सरकार व संस्था आज तयार नाहीत. या प्रयोगांचे यश पाहून सरकारने त्याचे सार्वत्रिकीकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नवा प्रयोग कितीही चांगला असला तरी राज्यसंस्था तो स्वीकारायला तयार होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. काही प्रयोग लोकहिताचे असतील तर त्याचे धोरणातही रूपांतर व्हायला हवे, उदाहरणार्थ, पंचायत सुरक्षा ऑडिट हे दर ८ मार्चला केलेच पाहिजे; पण ते अद्यापही मंजूर होत नाही.

## नागरी संस्थांचे वावडे

नागरी संस्थांना सोबत घेऊन काम करण्याचे शासन संस्था बऱ्याचदा टाळत असल्याचे दिसते. त्यांना जास्तीत जास्त लांब ठेवण्याचा प्रयत्न खूपदा होताना दिसतो आहे. स्वयंसेवी संस्थांना सोबत घेणे म्हणजे त्यांच्या शंकांना आणि प्रश्नांना अंगावर घेणे, अशी शासन संस्थेची मानसिकता झाल्यासारखी दिसते. त्यामुळे सर्व समित्या केवळ अधिकाऱ्यांच्याच असल्याचे दिसते.

पहिल्या महिला धोरणात सामाजिक संस्था जोरदारपणे उतरल्या होत्या, तसे आता संस्था-संघटनांना बोलावणे होतेच असे नाही. आज आम्ही पंचायत राजमधील कार्यकर्ते फक्त दोष तपासण्याचे काम करत नाही; तर पंचायतींची व्यवस्था आणि महिला भागीदारी अधिक मजबूत होण्यासाठी कोणकोणते विकल्प असू शकतात, याविषयी प्रत्यक्ष कार्यही करत आहोत. अनेक वेळा फक्त प्रश्न उपस्थित केले जातात; परंतु आपण या प्रश्नांबाबतचे पर्याय नेमक्या कृतीतूनही देण्याचा प्रयत्न करत आहोत.

आम्ही गेली २५ वर्षे कारभारणींसोबतच या 'राजकीय आजारां'चा सामना करत आहोत. महिलांना मिळालेल्या निम्म्या आरक्षणाने हे काम जरा सोपे झाले आहे. परंतु, वर मांडल्याप्रमाणे आव्हानेही तितकीच गंभीर आहेत. सर्वांत मूळ घटक आहे, ते पंचायतीतील लोक! महिला, गावकरी व ग्रामपंचायत यातील दरी बुजली तर हे प्रश्न सुटू शकतात. त्यासाठी गावकऱ्यांनी सर्वप्रथम महिला सक्षमीकरणाचे स्वत:चे पहिले पाऊल आपल्या मर्जीने उचलले पाहिजे !

## सरकारी भाषेचा अडथळा

महिला सहभागाने सरकारची भाषा महिलाही शिकतील आणि सरकारनेही महिलांची भाषा शिकावी. लोकांसोबत आपण काम करतो तेव्हा आपली आणि लोकांच भाषा महत्त्वाची भूमिका बजावत असते. आज सरकारी आदेश, परिपत्रकांची भाषा खरेच महिलांना व सर्वसामान्यांना समजते काय ?

पंचायतीत आज महिलांचे अतिवंचित समाज समूहही आहेत, हे उघड वास्तव आहे. त्यांच्या दैनंदिन शोषणाला मुक्ती देऊन त्यांना या विकासप्रक्रियेत कसे सामील करून घेणार, याची उत्तरे पुढील महिला धोरणांत शोधावी लागतील. ग्रामपंचायतींतील महिला मनुष्यबळाचा क्षमताविकास करताना गावातील वंचित व महिला घटकांचासुद्धा प्रथम विचार करण्याची गरज आहे. पंचायतीसोबत काम करताना महिलावर्गाची विचाराची आणि कामाची दृष्टी एकांगी असून चालणार नाही. गावातील सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा पंचायतींचा सर्वसमावेशक कार्यक्रम असला पाहिजे.

## भौगोलिक चौकटीतून पाहताना...

शहरांच्या आजूबाजूला असलेल्या खेड्यांचे रूपांतर हळूहळू शहरांत होत

आहे.. गावाचे शहर होतानाच्या प्रवासात नवनवे प्रश्न तयार होत आहेत. या प्रश्नांकडे नीट लक्ष देऊन, नवे पर्याय शोधावे लागतील. गाव स्तरावरील महिला व एकूण मनुष्यबळाचा विचार करताना हक्काधारित दृष्टिकोन ठेवून विचार होताना दिसत नाही. प्रत्येक जण फक्त सेवेचा व व्यक्तिकेंद्री लाभाचा विचार करून मार्गक्रमण करत आहे. आज भारताचे 'डिजिटल इंडिया' बनण्याचे स्वप्न आहे. पण कोकण व उत्तर महाराष्ट्राच्या विंध्य पर्वत रांगांत वसलेल्या नंदुरबार किंवा धुळ्यासारख्या भागांत पंचायतींना २४ तास इंटरनेट सेवा कशी पोहोचेल, याचा विचार होताना दिसत नाही. ग्रामपंचायतीच्या सर्व सेवा ऑनलाइन झाल्या आहेत. पण, जिथे विजेचे लोडशेडिंग होते आणि इंटरनेट सेवाच नाही, तिथे हे कसे शक्य होईल, याचा व्यावहारिक विचार झाला पाहिजे.

मराठवाड्याच्या महिलांच्या सर्वांगीण विकासाबाबत मांडणी केली जाते तेव्हा त्या मांडणीला राज्य व्यवस्थेचा सावत्रपणा व लोकांच्या नकारात्मकतेची झालर असते. मराठवाड्यातील जनता जगण्याच्या मूलभूत प्रश्नांसाठी आजही संघर्ष करत आहे, हे वास्तव असले तरी मराठवाड्याच्या महिला विकासाबाबत सकारात्मक शोध घेण्याची खूप गरज आहे. आदिवासी स्वशासन भागातील 'पेसा' ग्रामपंचायतीचे नियम व नियमावली तयार झाली आहे; पण त्याचीही काटेकोर अंमलबजावणी होताना दिसत नाही. 'स्व-शासन' हा मूलमंत्र आहे; परंतु शासनच याबाबत फारसे इच्छुक नाही.

## एकत्रित मनुष्यबळाचा विचार

ग्रामपंचायतीच्या मनुष्यबळाचा विचार करताना राज्य व केंद्र स्तरावर परिशिष्ट ११ मधील २९ विषयांच्या हस्तांतरणाचा मुद्दा धोरणाच्या पातळीवर प्रथम सुटण्याची गरज आहे. केरळप्रमाणे सर्व २९ विषय पंचायत राजला सोपवायला हवेत. पंचायत स्तरावरील हे सर्व प्रश्न व अडचणी यांचा सर्वांनी मिळून सामना करण्याची गरज आहे. ज्या महिला आघाड्या, संस्था व संघटना पंचायत राजमध्ये काम करत आहेत, त्यांनी तरी किमान एकत्र येऊन या तळातल्या लोकशाहीच्या कामाला सुरुवात केली पाहिजे. महिला सक्षमीकरणाबाबत पंचायतीचे 'फायनान्स, फंक्शन्स व फंक्शनरीज' (वित्त, कार्य व कार्यकर्ते) ही तिन्ही अंगे महत्त्वाची असून प्रत्येकाचा सुटासुटा विचार करून चालणार नाही. तळातील लोकशाही व्यवस्था

गतिमान करण्यासाठी महिला, युवक व वंचित या सर्व घटकांचा एकत्र विचार करण्याची गरज आहे. महिला व विकेंद्रीकरण परस्पर सामर्थ्य देणारे विषय आहेत; त्याची परस्परपूरकता बळकट केली पाहिजे.

## कैसे भेदिले सत्तामंडळा...

गाव कारभारणी म्हणतात, 'आरक्षणाने आम्ही सत्तेत आलो हे खरं; परंतु राज्यकारभारात आता आमची 'द्रौपदी' होत चालली आहे. पक्ष- पुढारी, ग्रामसेवक, पॅनेल प्रमुख, स्थानिक गावनेता व घरचा धनी हे सगळेच आमच्यावर सत्ता गाजवतात!' कधीतरी एखादा समानता मानणारा आशेचा किरण दिसतो, तेव्हा 'कैसे भेदिले सत्तामंडळा...' असेच म्हणावे वाटते!

## कुटुंबाची बंधने आणि पतीची असुरक्षितता

राजकारणातील कारभारणींचे सासरे, दीर किंवा पतिराज समजून घेणारे असतील तर त्या महिलेला पुढे प्रगती करण्यासाठी त्यांची सहज मदत होते, तसेच त्यामुळे सामाजिक व राजकीय विकासातील तिचे योगदानही वाढते. काही महिलांसाठी ही आदर्श परिस्थिती अस्तित्वात असली तरी बहुतांशी महिलांच्या संघर्षाची सुरुवात त्यांच्या परिवार-सत्तेपासून होते; ज्यात भावनिक व शारीरिक अन्यायाबरोबरच राजकारणातील अस्वीकाराचीही सुरुवात होते. पतिराज हे कारभारणींच्या हालचालींवर सतत बंधने घालतात आणि तिच्या वतीने निर्णय घेतात. आर्थिक व्यवहारातही अविश्वास दाखवला जातो. शिवाय, फोनमधील तपासणीत पंचायत सहकाऱ्यांचे फोन नंबर तपासून कारभारणींच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित केला जातो. महिलांना ग्रामपंचायतींमधील बैठकांना उपस्थित राहण्यासाठी अजूनही काही ठिकाणी परवानगी काढावी लागते. काही महिलांना निर्णय घेण्याचा आजही अधिकार नाही आणि एखादा निर्णय घ्यायचाच असेल तर तो पतीशी सल्लामसलत करूनच घ्यावा लागतो. एखाद्या महिलेला काही कामानिमित्ताने घराबाहेर जायचे असेल तर घरातील सर्व कामे करून जाणे बंधनकारक असते. राजकारणातील महिलांच्या सहभागाचा स्वीकार बहुधा पतिराजांकडून केला जात नाही. उलट, राजकारण हे वेळखाऊ काम असल्याचे वेळोवेळी त्यांना सांगण्यात येते. असे असूनही महिलांनी राजकारणात आपला वेगळा ठसा उमटवला आहे, हे नक्की!

आपल्या पतीशी पंचायतीत वागताना त्यांनी वेगवेगळ्या डावपेचांचा अवलंब केला. उदाहरणार्थ, घरातील व शेतीची सर्व कामे करणे, कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या गरजा व मागण्या पूर्ण करण्यासाठी स्वावलंबी बनवणे, पतीशी सार्वजनिक स्थळी आदरपूर्वक बोलणे, राजकीय काम हे वेळखाऊ नसल्याचे त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करणे! पतीच्या किंवा जोडीदाराच्या दृष्टिकोनात बदल व्हावा यासाठी महिलांनी त्यांची समज वाढवण्यासाठी त्यांच्याबरोबर लोकशाही मूल्ये आणि समानता या विषयांवरील चर्चा वाढवली.

महिलांना प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमांतून सामाजिक परिस्थिती समजते; आणि पतीकडून पाठिंबा मिळवण्यासाठी सर्व पतींची, महिला आणि मानवी हक्कासंदर्भातील जाणीव वाढवणे गरजेचे असते. काही वेळा पतीबरोबर असणाऱ्या काही मतभेदांसाठी त्याला विरोध करण्याने काही साध्य होत नाही. त्यामुळे आपल्या जोडीदाराबरोबरचे काही मतभेद स्वीकारणे, आणि वेळ आलीच तर त्यांच्या पाठिंब्याशिवाय पुढे जाणे योग्य ठरते. काही महिलांनी पतीकडून पाठिंबा मिळवण्यासाठी प्रसारमाध्यमातील मुलाखतींमधून होणाऱ्या प्रसिद्धीचा चांगला वापर केला. महिलांना राजकारणामधून नाउमेद करण्यासाठी त्यांच्या चारित्र्यावर प्रश्न निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. त्यांचा विरोध मोडण्यासाठी या पतींना विविध कार्यक्रमात व प्रशिक्षणात सहभागी करून घेणे, तसेच सभोवतालच्या कामांची व कार्यकर्त्यांची ओळख करून देणे, अशा स्वरूपाचे प्रयत्नही केले जातात. हा 'जोतिबा संवाद' खूप उपयोगी ठरतो. महिला धोरणात जोतिबा जागर अभियानाला अव्वल स्थान दिले पाहिजे.

गाव कारभारणी राजकीय कामांमध्ये आपल्या पतीची मदत मागतात आणि जर पती पाठिंबा देणार नसेल तर त्याला समजवण्याचा प्रयत्न केला जातो. काही वेळा काम पूर्ण करण्यासाठी महिलांना आपल्या पतीशी खोटे बोलावे लागते. महिलांनी आपल्या पतीशी जुळवून घेण्याचे बरेच प्रयत्न केले; परंतु प्रत्येक वेळी त्यात त्यांना यश आलेच असे नाही. अशा वेळी संघटनेतील अनुभवी तज्ज्ञांची त्या मदत घेतात. परंतु त्यासाठी त्यांच्या हक्काची हेल्पलाइन सरकारने सुरू करायला हवी.

कौटुंबिक दबावामुळे महिलांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. बाईला निरंतरपणे काळजीवाहू भूमिका बजावणे, नात्यांची जपणूक करणे, घरातील

तसेच शेतीची कामे बघणे ही कामे आहेतच. आरक्षणाने महिलांना संधी उपलब्ध करून दिली असली तरी त्यांनी दैनंदिन राजकारणात सहभागी होऊ नये, यासाठी कुटुंबाकडून होणारा दबाव महिलांना सहन करावा लागतो. काही महिला त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमीच राजकीय असल्यामुळे कुटुंबातच राजकारण शिकतात. जातिव्यवस्था आणि समाजातून वगळणे असे प्रकार अजूनही गावात अस्तित्वात आहेत. त्यामुळे गरीब आणि अनुसूचित जातीच्या महिलांना गाव- विरोधामुळे कुटुंबाकडूनही विरोध सहन करावा लागतो. महिलांनी आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण करून इतरांसाठी काम केले तरी त्यांच्या कुटुंबाकडून त्यांना पाठिंबा आणि कौतुक सहसा मिळत नाही. यासाठी परिवार सन्मानपत्रसमान सकारात्मक मोहिमा गरजेच्या आहेत.

महिलांना आपल्या कुटुंबाबरोबर वागताना नेहमी नम्र व चतुरपणे वागावे लागते. कुटुंबाचे वेगवेगळे पैलू हाताळताना महिलांनी विविध सोप्या अस्त्रांचा वापर केला. उदाहरणार्थ, वेळेचे नियोजन, निर्णयप्रक्रियेत कुटुंबाचा सहभाग वाढवणे आणि आपल्या कामासंबंधीच्या संवादात स्पष्टता आणणे इत्यादी.

काही घटनांमध्ये तणाव टाळण्यासाठी महिलांनी सहनशील राहणेच पसंत केले. संघर्ष झालाच तर विरेचनाच्या पद्धतीप्रमाणे रडून आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. ग्रामपंचायतीमध्ये काम करण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी महिलांनी कुटुंबातील मंडळींमध्ये कामाची विभागणी करून दिली. तसेच काही जबाबदाऱ्या त्यांनी वाटून घ्याव्या, यासाठी विचारणा केली.

कुटुंबातील व्यक्तींकडून पाठिंबा आणि विश्वास मिळवण्यासाठी महिलांनी त्यांना विविध कार्यक्रमांमध्ये आणि निर्णयांमध्ये सहभागी करून घेतले. तसेच, शक्य असेल तिथे आपल्याबरोबर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची व कार्यकर्त्यांची ओळख करून दिली. प्रशिक्षण अभ्यासक्रमातही या आव्हानांना समोरे जाण्याचे कौशल्य महिलांना शिकवायला हवे!

## महिलांचे आर्थिक सक्षमीकरण

या महिलांनी तणावाच्या परिस्थितीत आपल्या कुटुंबाला साथ देणे हे त्यांच्यासाठी फायदेशीर ठरले. आरक्षणामुळे महिलांना राजकीय कामात येण्याची संधी मिळाली आणि कुटुंबाला बरोबर घेऊन केलेल्या नियोजनामुळे पुढे जाण्याची

प्रेरणा मिळाली.

शेती हा अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग असल्यामुळे गावातील बहुतेक महिलांना शेतीच्या व मशागतीच्या कामांमध्ये सहभागी व्हावे लागते. शेतीमध्ये असणाऱ्या कामाच्या प्रचंड ताणामुळे महिलांना राजकीय कामात सहभागी होता येत नाही. त्यावर उपाय म्हणून शक्य असल्यास मनुष्यबळ बाहेरून घेऊन शेतीपासून उत्पन्न मिळवणे, हेच त्यांच्यासाठी उपजीविकेचे एकमेव साधन आहे. हे उत्पन्न वाढवण्यासाठी त्यांनी विकसित व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला आहे.

काही महिलांनी आठवड्यातील एक दिवस ग्रामपंचायतीच्या कामासाठी राखून ठेवला आहे; जेणेकरून शेती आणि ग्रामपंचायत या दोघांवरही कामाचा परिणाम होणार नाही. तसेच काही महिला सामाजिक संस्थांत काम करून किंवा शिलाईकाम करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत असतात. स्वयंसहायताता गटात महिलांनी दैनंदिन खर्चाचा हिशेब ठेवल्यामुळे त्यांना आर्थिक बाबी कशा हाताळायच्या, हे शिकता आले. शिवाय, त्यांना अनावश्यक व टाळता येण्याजोग्या खर्चाची माहितीही मिळाली.

कोणत्याही मालमत्तेचा पहिला हक्क परंपरेने पुरुषांचा असतो. परंतु काही महिलांनी मालमत्ता मालकी हक्कासाठी आपल्या कुटुंबासोबत संघर्षही केला. राजकीय सक्षमीकरणाबरोबरच, म्हणूनच दीर्घ पल्ल्याच्या राजकारणासाठी महिलांचे आर्थिक सक्षमीकरणही खूप महत्त्वाचे ठरते.

कारभारणींनी सरकारी योजनांच्या योग्य अंमलबजावणीतूनही गावाचा विकास करून आपले नेतृत्त्व चांगल्या तऱ्हेने सिद्ध केले आहे. गावातील विविध मुद्दे आणि समस्यांवर काम करत असताना वर्षानुवर्षे सत्ता भोगणाऱ्या उच्चजातीय प्रस्थापित व उच्चवर्गीय, तसेच गावातील संसाधनांवर अधिकार गाजवणाऱ्या सत्ताधारी वर्गाकडून खूप विरोध सहन करावा लागला. अशा सत्ताधाऱ्यांना गावकऱ्यांकडून कधीही विरोध झाला नव्हता. त्यांना कोणत्याही पातळीवर कुणीही आव्हान दिले नव्हते. परंतु आरक्षणामुळे महिला सत्तेत आल्या आणि ही परिस्थिती बदलू लागली. विरोधकांसाठी महिलांचा आपला नेता म्हणून नुसता विचारही करणे आणि ते स्वीकारणे खूप अवघड होते. त्यामुळे त्यांनी साहजिकच महिलांच्या कामात अडथळे आणायला सुरुवात केली. उदाहरणार्थ, वाळूचा उपसा करायला विरोध

केला की पुरुष पुढारी चिडतात.

## पैसा, दारू, चारित्र्यहनन

महिला आणि तिच्या घरातील मंडळींना असभ्य भाषा वापरून, मुद्दाम ग्रामसभेमध्ये आणण्याची रणनीती विरोधकांकडून नेहमी वापरली गेली. महिलांनी गावात काही भरीव कामे करून विरोधकांना एक प्रकारे आव्हानच दिले, त्यामुळे विरोधकांच्या मनात भीती निर्माण झाली. निवडणुकीदरम्यान विरोधकांनी पैशाची व दारूची लालच दाखवून मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला. महिला 'लोकप्रतिनिधी' बनल्या तरी विरोधकांच्या म्हणण्यानुसार ज्यांना काम करावे लागले, त्या त्यांच्या हातातील बळीचा बकरा बनल्या! विरोधकांनी महिलांवर कलम १४ ग अंतर्गत भ्रष्टाचारासारखे खटले दाखल करून त्यांना नाउमेद करण्याचाही प्रयत्न केला.

दुसऱ्या बाजूला, निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींना गावाच्या विकासाच्या संदर्भात होणाऱ्या निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढवण्याची आवश्यकता वाटत होती. पुरुष - विरोधकांनी गाव समित्यांमधील महिलांच्या ५० टक्के आरक्षणाला विरोध केला. महिलांच्या या बौद्धिक बदलाला नियंत्रित करण्यासाठी या विरोधकांनी त्यांच्यावर अविश्वासाचे ठराव आणले. त्यांनी महिलांच्या निर्णयाला विरोध केला, तसेच ग्रामसभेचे काही महत्त्वाचे आणि सुनियोजित कार्यक्रमही रद्द केले. त्यांनी ग्रामसभेत होणाऱ्या निर्णयांची तसेच आर्थिक बाबींची माहिती महिलांनाच दिली नाही, अडथळ्यांत भर म्हणून की काय; महिलांनी निवडणुका लढवू नयेत, यासाठी दबावतंत्र आणि हिंसाचाराला साथ द्यावी, यासाठी त्यांनी महिलांना लाचही देऊ केली. त्याचा काही उपयोग होत नाही हे लक्षात येताच महिलांच्या चारित्र्यहननाच्या माध्यमातून राजकारणापासून परावृत्त करण्यासाठी जबरदस्तीही केली. चारित्र्यहनन करण्रयाला आपणाकडे ठोस शिक्षा नाही आणि गावातील लोकही फार गंभीरपणे महिलेला साथ देत नाहीत..

## ग्रामसभेचे हत्यार

विरोधकांसाठी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींकडे एकच ठोस उत्तर होते. ते म्हणजे, ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या संमतीने सरकारी योजनांची योग्य अंमलबजावणी करून गावाचा विकास करणे. कोणत्याही विकासात्मक

कामाची रूपरेषा ठरवताना लिंगभाव व संवेदनाशीलता हा निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचा महत्त्वाचा विषय राहिलेला आहे. गावातील विकासात्मक कामांसंदर्भातील निर्णयप्रक्रियेत महिलांची भागीदारी टिकवण्यासाठी त्यांनी महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढवली. त्यामुळे विरोधकांचा विरोध कमी व्हायला मदत झाली. ज्या ठिकाणी विरोधक ग्रामपंचायतसंदर्भातील काही आर्थिक आणि इतर बाबींची माहिती सांगायला कां कू करत होते, तीच माहिती सरकारी कार्यालये आणि माहितीचा अधिकार कायदा २००५ यांच्या माध्यमातून महिलांनी गोळा केली. गाव समितीतील 'सदस्य निवडी'चा निर्णय ग्रामसभेतून घेतला गेल्यामुळे महिलांना ग्रामसभेचा पाठिंबा मिळाला. निवडून आलेल्या महिल प्रतिनिधींनी गाव समित्यांमधील महिलांच्या ५० टक्के जागांसाठी संघर्ष केला. है सर्व पाहता ग्रामसभा नियमित होणे महत्त्वाचे आहे. 'तहकूब ग्रामसभा' ही सुखसोय रद्द करून टाकावी !

## विरोधकांशी सहकार्य

विरोधकांनी वापरलेल्या विविध क्लृप्त्या आणि डावपेच शिकून घेऊन, त्याचा अवलंब करून त्यांना त्यांच्याच भाषेत कारभारणींनी उत्तरं दिली. काहींनी पुढाकार घेऊन विरोधकांशी संवाद सुरू केला आणि गावाच्या संपूर्ण विकासासाठी साहाय्य करण्याचे आवाहन केले. काही जणींनी गावाच्या विकासासंदर्भात महिलांमध्ये जागृती केली, विकासकामांवर लक्ष केंद्रित केले, महिलांचा पाठिंबा टिकवून ठेवला आणि विरोधकांकडे दुर्लक्ष केले. विरोधकांच्या विरोधाची तीव्रता कमी व्हावी, यासाठी त्यांनी विरोधकांच्या घरातील मंडळींबरोबर चांगले संबंध प्रस्थापित केले. महिलांचे नेतृत्व मान्य व्हावे यासाठी समान मुद्दे उपस्थित करणे, विरोधकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे प्रश्न सोडवणे या नेहमी कामी येणाऱ्या साध्या डावपेचांचा वापर केला. गावातील मुद्यांसंदर्भात विरोधकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी महिलांनी आपण पूर्ण केलेल्या कामाचे श्रेय विरोधकांना दिले, विविध सरकारी अध्यादेशांचा अभ्यास सुरू केला. शिवाय, या अध्यादेशांच्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये जाणीव-जागृती करण्याचे कामही सुरू केले. त्यामुळे 'विरोधकांशी सुसंवाद' ही कौशल्ये प्रशिक्षणात जरूर शिकवली पाहिजेत !

## जातीच्या बेड्या

राजकारणातही जातीची भूमिका महत्त्वाची आहे. जाति आधारावर भेदभाव ही सगळीकडे आढळणारी कटू गोष्ट आहे. भारतीय राजकारणात महिलांना मर्यादित प्रवेश असून, ती महिला अनुसूचित जातीतील असेल तर तिला विविध प्रकारच्या जातीय भेदभावांना सामोरे जावे लागते, ते मुख्यत: दोन कारणांसाठी ! एक म्हणजे, ती महिला राजकारणात जाण्याचा विचार करते, त्याच क्षणी तिच्या संघर्षाला सुरुवात होते. महिलांना निवडणुकीसाठी अर्ज भरताना व निवडणूक प्रचारापासूनच विविध समस्यांचा सामना करावा लगतो. निवडणूक जिंकल्यानंतरही उच्च जातीतील काही लोकांकडून होणाऱ्या असहयोगामुळे त्यांचा संघर्ष सुरूच राहतो. निवडणुकीदरम्यान उच्चजातीय समाजाकडून असा प्रचार केला जातो की, खालच्या जातीतील महिला उपजीविका आणि ग्रामपंचायतीमधील काम यांचा समतोल राखू शकत नाही. वरच्या जातीतील महिलांनी खालच्या जातीतील लोकांना साहाय्य केले अथवा त्यांच्यासाठी काम केले तर त्यांना त्यांच्याच जातीतील लोकांकडन विरोध केला जातो. सुशिक्षित लोकही दलित महिलांसमवेत असहकार्याची भूमिका घेतात, ही खेदाची गोष्ट आहे. राजकारणात गावाच्या विकासापेक्षा 'जात' हा महत्त्वपूर्ण घटक असतो. गावात अजूनही जातश्रेणी आहे, यासाठी 'आम्ही सख्ख्या नाय, पण पक्क्या बहिणी !' ही घोषणा गावागावांत पोहोचली पाहिजे.

## सामाजिक बदलांना सुरुवात

गावातील जातिभेद कमी करण्यासाठी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनी विविध डावपेचांचा वापर केला. उदाहरणार्थ, उच्च समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांसमवेत संवाद साधणे, जातिनिहाय स्वयंसहायता गटाची बांधणी करून त्यांच्याशी नातेसंबंध टिकवणे. त्यांनी गावाच्या विकासासाठी गावातच आधार तयार केला. काही प्रतिनिधींनी जाती-आधारित भेदभावांकडे दुर्लक्ष केले. त्यांचा विश्वास आहे की, समाज हळूहळू बदलेल. विधवा महिलांचे सामाजिक स्थान अत्यंत निराशाजनक आहे. सामाजिक संकेतांनी नेहमीच विधवा महिलांच्या कौटुंबिक तसेच सार्वजनिक कार्यातील सहभागाला अटकाव केला आहे. मात्र, महिलांनी धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये भगिनींना शैक्षणिक भेटवस्तू देऊन

परिस्थिती थोडी बदलली आहे. आता एकल महिलांनाही सहजपणे सोबत घेतले जात आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांचा खोडा

गावाच्या विकासासाठी या राज्यातील महिला लोकशाही मार्गाने निवडून आल्या. त्यांच्या विविध योजना मांडून पंचायत कारभारणी त्या मंजूर करून घेतात. मात्र, अंमलबजावणीचे काम सरकारी अधिकारी करतात. सरकारी अधिकाऱ्यांना अंमलबजावणीसाठीची योजना व तिच्यावर होणारा खर्च ठरवण्याचा अधिकार असतो. सरकारी कर्मचारी हे त्यांच्या विविध संघटनांच्या माध्यमातून संघटित होतात. त्यांना लोकाभिमुख करणे हेच एक आव्हान असते. सत्तेच्या विकेंद्रीकरणामध्ये ग्रामसभेला गावाच्या विकासाचे निर्णय घेण्याचे अधिकार असतात. ग्रामसभेत घेतलेले निर्णय अमलात आणणे हे सरकारी कर्मचारी आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या हातात असते. ते दोघेही एकमेकांवर अवलंबून असतात, खेड्याच्या विकासासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करताना अधिकारी हे त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण न करण्याबाबत, माहिती लपवण्यासाठी आणि निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींबरोबरच्या असहाकार्याबाबत प्रसिद्ध आहेत. गाव कर्मचाऱ्यांनी महिला लोकप्रतिनिधींसमवेत समतेने वागायची आचारसंहिता व त्याबाबतची नियमावली खूप गरजेची आहे.

काही ग्रामसेवक प्रभावी महिला प्रतिनिधींचे काम त्यांच्या प्रभावीपणामुळेच दुर्लक्षित करतात. शिवाय, ते महिलांच्या बाबतीत बहुधा असंवेदनशील असतात. महिलांना आर्थिक बाबीतील माहिती घेताना संघर्ष करावा लागतो. काही वेळा, भ्रष्टाचार लपवण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांकडून महिलांना लाचेचे आमिष दाखवले. समाजाचा विकास साधण्यासाठी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा पाठिंबा असणे आवश्यक असते. जनतेचा त्यांच्या अधिकारांवर हक्क सांगून, त्यांनी काम करणे हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे, याची त्यांना आठवण करून देऊन गावाचे काम साध्य करता येऊ शकते. महिला प्रतिनिधींनी सरकारी अध्यादेशांचा अभ्यास करून योजनांच्या अंमलबजावणीसाठी चांगला दबाव निर्माण केला. सरकारी सेवकांनी ग्राममपंचायतीच्या कार्यपद्धतीतील माहिती लपवण्याचा प्रयत्न केला, पण महिलांनी माहितीचा अधिकार वापरून ही माहिती मिळवली; सरकारी योजनांच्या

बाबतीत ग्रामस्थांची मते आजमावून घेतली आणि ग्रामस्थांच्या परवानगीने त्यांची अंमलबजावणी केली. या योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी ग्रामस्थांच्या गाव समित्यांचीही स्थापना केली. गावातल्या युवक मंडळांनी व जोतिबा आघाड्यांनी गाव कारभारणींना भक्कम पाठिंबा दिला तर गावाचा कायापालट होऊ शकतो.

**पक्षीय राजकारणाचा तिढा**

अजूनही ग्रामपंचायत निवडणुकांत राजकीय पक्षांचा प्रत्यक्ष सहभाग दिसत नसला तरी अप्रत्यक्षपणे हे पक्ष मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. राजकीय पक्ष आपल्या गटांमार्फत निवडणूक लढवतात व अशा गटांमार्फत उमेदवारी मिळवणे महिलांना अतिशय कठीण जाते. राजकीय पक्षात आपले स्थान निर्माण करणे, हाच महिलांसाठी मोठा संघर्ष असतो. शिवाय, राजकीय पक्ष, फक्त निवडणुकीच्या काळातच संपर्क करतात. कार्यशील महिलांना फक्त राजकीय पक्षांकडूनच नव्हे; तर पक्षातील कार्यकर्त्यांकडूनही निवडणूक लढवण्यासाठी विरोध होतो. राजकीय पक्षांची, समाजातील प्रतिमा गोंधळाची असल्यामुळे महिलांसाठी राजकीय पक्ष आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणे कठीण असते. काही वेळा महिला, पक्षाची सभासद असली तरी वैयक्तिक मूल्ये आणि पक्षांची मूल्ये समान नसतात. जिथे निवडणुकीसाठी आणि ग्रामपंचायत स्तरावर पक्षांचा पाठिंबा मिळत नाही, तिथे निवडणुकीच्या माध्यमातून एखाद्या पक्षासोबत काम करण्याची महिलेची इच्छाही स्वीकारली जात नाही. त्यामुळेच राजकीय पक्षात स्वत:साठी, कायमस्वरूपी आणि टिकाऊ पर्याय निर्माण करणे महिलांसाठी कठीण झाले आहे. पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीसाठी लढाऊ कार्यकर्त्या कारभारणींना पक्षांनीही उमेदवारी दिली पाहिजे.

काही ठिकाणी, राजकीय पक्षांकडून उमेदवारी न मिळाल्याने महिलांनी स्वतंत्रपणे 'अपक्ष' म्हणून निवडणूक लढवली. महिलांना हा विश्वास होता की, कठोर परिश्रम आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर त्यांना राजकीय पक्षांत स्थान मिळेल. पक्षांची विचारसरणी समजून घेण्यासाठी महिलांनी पक्ष कार्यकर्ते आणि राजकीय अभ्यासक यांच्याशी संवाद साधला. विविध पक्षांतील महिलांनी राजकीय समन्वयाच्या बांधणीसाठी समान मुद्द्यांच्या सोडवणुकीत एकमेकींना मदतही केली. ही

गती धीमी असली तरी कमी नाही.

## नवीन महिला धोरणाकडून अपेक्षा

महिला धोरणाच्या नजरेतून नवा प्रवास समजायचा तर तो नव्या भूमिकेतूनच जाणून घ्यावा लागेल. तरुण शेतकरी मुलांना आज मुली मिळत नाहीत, हेही खरं! तसेच 'करीन तर शेतकरीच नवरा करीन...' हे गाणं फक्त सगळीकडे नाचगाण्यापुरतं गाजतंय, हेही खरं! शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही; त्याला भाव ठरवायचा अधिकारही नाही. शेतमाल सोडून, बाकी सगळी कारखानदारीची उत्पादनं छापील व मालक सांगेल त्या किमतीने बाजारात येतात. शेतकरी मात्र आपल्या मालाची किंमत ठरवू शकत नाही. त्याची पोरं नाइलाजानेच शेतात हात घालतात. शहराची ओढ पहिली, मग शेताची धोंड कशाला गळ्यात? शेतीला तसाही व असाही भाव नाही हेच खरं! महिला व शेती यांचा पंचायत राजशी आज काहीच मेळ नाही.

भटक्या जमातीतील महिला, गावातले फिरस्ते, वासुदेव, साधू, गोपाळ समाज, भटके यांना चोरी व गुन्हेगारीतून हळूहळू सुटका मिळत चालली तरी, ते अजूनही एका जागी स्थिर नाहीत. गावातल्या तरुणींना व मुलींना सर्वप्रथम आपले गाव, आपले घर, आपली माणसं, यात सुरक्षितता वाटली पाहिजे. बऱ्याचदा घरातलाच नजीकचा माणूस तरुण पोरीचा बलात्कारी आरोपी ठरत आहे. गावागावांत दारूचे अड्डे, रस्त्यावरचा अंधार, पोलीसगस्तीचा अभाव, लांब अंतरावरच्या शाळा, एसटी बसचा तुटवडा, रस्त्यांची दुर्दशा यामुळे पोरीबाळी त्रासून सरळ शाळा सोडतात. मुली शिकल्या तर जिंकल्या! त्या पहिल्या नंबरातच येतात; पण शिकायची किमान सोय व सुरक्षा तरी गावाने दिली पाहिजे!

लग्न, सण, समारंभ, वाढदिवस हेही खूपच फिल्मी बनत चालले आहेत... विवाहाचे मॉडेल, तर सिनेमाचा ट्रेलर दिसतो. जोडप्यांचा लग्नाचा वाढदिवस, हेही खूपच शहरी व पुनःपुन्हा फुलांचे हार परस्परांना घालून विवाह 'परवाना' पक्के करणारे बनत आहेत. समारंभप्रियता ही आज मूलभूत गरज बनत चालली आहे. या अर्थकारणाचा फटका सामान्य कुटुंबांना बसतो. गावात आठवडी बाजार अजूनही आहेत, परंतु त्यातील आवक-जावक व ग्राहक खूप बदलत चालले आहेत. मिठाईवाले, बांगडीवाले, कपडेवाले, भाजीवाले असे काही छोटे व्यापारी यात तगून

‘महिला ग्रामसभा’ नावाची गोष्ट आहे हे कानांवरून जाऊ लागलं. पतीने मारले तर बाई बचत गटात येऊन रडून का होईना, सांगू लागली. एखादा प्रश्न बाईच जोर लावून मांडायला लागली व बजेटही मागू लागली. पण तिला गावाचा व तिच्या कुटुंबाचा आधार भक्कमपणे मिळाला पाहिजे. परिवारातील पुरुषसत्ता व पक्षातली नेतेगिरी अजूनही तिच्याकडे ‘माणूस’ म्हणून पाहत नाही. ‘बाई ती बाईच’ तिला माणूस समजण्याचा प्रवास अजूनही सुरूच आहे; तो संपायला हवा, म्हणूनच सर्व राजकीय पक्षांमधूनही स्वतःचे महिला धोरण बनायला हवे! तसेच त्या महिला धोरण आचरणातही यायला हवं!

## महिला धोरण आणि राजकीय पक्ष

आरक्षण हा महिलांचा अधिकार आहे, असं खणखणीत वातावरण व मन तयार व्हायला अद्याप वेळ आहे. परंतु आजपर्यंतची गुंतवणूक व कर्माचे फळ आपणाला मिळालेच पाहिजे, हा पुरुषी नेत्यांचा वसूल पक्का झाला आहे. याचा अर्थ दैनंदिन सत्य व सत्तेची पूर्ण फारकत झालेली नाही, हे खरं! परंतु महिलांनाही सत्तेजवळ सत्याला घेऊन जाताना वेडीवाकडी वळणं आहेतच की! सुखासुखी प्राप्त होईल ती सत्ता कसली! त्यातील नवनवीन आव्हाने कोणती? महानगरपालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांमधून कारभारणी निवडून येण्यागोदर राजकीय पक्षांमार्फत उमेदवारी ठरवण्यात तरी त्या शंभर टक्के असतातच, याची खात्री नाही. त्यांच्या कामातून व प्रेरणेतून त्या निवडणुकीला उभ्या राहिल्या तर चित्र खूपच वेगळे व आशादायी असते. परंतु निवडणुकीत ‘पडेल’ मतदार संघ म्हणजे ‘ताईंचा’ मतदारसंघ!’ हे सूत्र पुढाऱ्यांनी शोधले. आरक्षण पडल्यावर ‘यशाची खात्री’ हा निकष पक्षासाठी खूप महत्त्वाचा असतो. सभागृहात आपली मागणी लावून धरायची तर बहुसंख्यांची गरज असते. त्यामुळे नव्याने तिकीट मागणाऱ्या महिला वॉर्डात काम छान करत असतील, परंतु त्यांच्याकडे निवडणूक जिंकण्याचे मेरिट नसेल तर पक्ष हा निर्णय घेत नाही.

प्रत्यक्षात ३३ टक्के आरक्षणानंतरही गेल्या अडीच दशकातील कारभारणींची कामगिरी अजिबात निराशाजनक नव्हती. म्हणून तर महिलांना निम्मे आरक्षण मिळाले! शिवाय उच्च सभागृहातही एक-तृतीयांश आरक्षण मिळेल, अशी आशा निर्माण झाली आहे. त्यामुळे महिलांचे कर्तृत्व हे पुरुषी नेतृत्वाला पचायला

आहेत. जोडधंदा असला तर शेतीला आधार मिळतो व शेतकरी जरा टवटवीत दिसतो! महिला शेतकऱ्यांना धोरणातून आधार मिळाला पाहिजे.

गावातील संतवाणी, सप्ताह, जत्रा, यात्रा व सण-समारंभही आता नवे रूप धारण करत आहेत. या गावातल्या प्रत्येक विषयाचा नेमका अभ्यास करून 'बदलता गाव' नेमका जोखला तरच नवयुगाची बदलाची गती व रणनीती ठरायला मदत होईल. खालच्या दर्जाचे मनोरंजन करणारे हरिभक्तपरायण (हभप ) खूप वाढले आहेत. यात महिलांची 'बाई' म्हणून खिल्ली उडवली जाते. महिलांच्या सन्मानासाठी धोरणात ठोस मुद्दे हवेत.

नव्या गावात, सकाळचा चहा, नाश्ता ते रात्रीच्या जेवणापर्यंत अन्न, पाककृती व सेवन पद्धतीही बदलत आहेत. त्यात वृद्धांना हा सकस आहार किती वेळेवर व योग्यरीत्या मिळतो, ते मात्र नव्याने समजून घ्यायला हवे. गावातल्या वृद्धांचे प्रश्न व घर सांभाळायची त्यांची उपयोगिता हा मुद्दा खूपच गंभीर बनत चालला आहे. संपूर्ण गाव, साऱ्या गावकऱ्यांना सांभाळणारा गावगाडा आम्ही बालपणी पाहिला आहे. अपंग, आंधळा, मुका, बहिरा, एकल बाप, एकल महिला असा पुरा संसारच गावगाडा मानला जायचा. एका दमात एक गाव संपूर्ण रूपात व एका जबाबदारीने दिसायचा, त्यात काय अंतर पडले आहे ते नेमके हेरले पाहिजे. वृद्ध महिलांचा प्रश्न धोरणात मांडला पाहिजे.

सालकरी व कामकरी हे शेतीचे आधारस्तंभ होते व अजूनही आहेत. शेतमजूर मिळणे ही आज समस्या बनली आहे. श्रम व श्रमप्रतिष्ठा यांना शब्दापुरताच मान राहिला आहे. कष्ट करणारा बाप्या हा शेत सोडून आज जास्तीत जास्त गावपारावर पळतो; तर कष्टकरीण म्हणजे बाई ही जास्त शेतात दिसते. सकाळ-संध्याकाळ गप्पा ठोकायला गावात पारावर जाणारे तरुण वाढत चालले आहेत. तालमींच्या जागी आता हळूहळू बीअर बार दिसतात; तर ढोल, लेझीम जाऊन डीजे व रेकॉर्ड डान्सर येऊ घातले आहेत. मात्र, काही गावात तरुण मंडळीही इव्हेंट मॅनेजमेंटही करू लागली आहेत. त्यातील त्यांना मिळणारी कमाई वाढत चालली आहे. महिला धोरणातून पुरुष जागृतीचेही नवनवे मार्ग शोधले पाहिजेत.

गावातल्या बाया राजकारणात आल्या, तशा पंचायतीतल्या शिव्या व पाय नक्कीच खूप कमी झाल्या. झेंडावंदनाला बाया लांबून का होईना, डोकावू लागल्या.

थोडा वेळ लागेल, हे खरे! महिला राजसत्तेत आल्याबरोबर त्यांनी भर्रकन जादूची कांडी फिरवून मागचा सर्व विनाश नष्ट करावा, हे कसे शक्य आहे!

महिला विकासाचा अजेंडाच पुढे घेऊन जात आहेत, हे सांगायला आता कुणा संशोधकाची गरज नाही. परंतु बाईने जातीचेही राजकारण करावे, पैशांतही खेळावे, पक्षालाही पूर्ण बांधून घ्यावे व गरीब वर्गाचा झेंडा नावापुरताच खांद्यावर घ्यावा, जमलं तर विकासाला वेळ द्यावा किंवा जमलं तर महिला प्रश्नाला वाचा फोडावी, या राक्षसी अपेक्षांचा निर्णायक मालक तरी कोण? नगराध्यक्षा किंवा महिला सरपंच आली की ती भ्रष्टाचारी असणार नाही, ही शक्कल कुणाची? तिने भ्रष्टाचार करू नये, हे खरे; परंतु 'बाई असून पैसे खाते!' हे मत कधी, कुणी, कसे तयार केलं? तीसुद्धा याच समाजात वावरते, निरीक्षणं करते व शिकते. तिला बाई म्हणून नवा न्याय व बाप्यांवर मनमानीच्या सबसीडीची खैरात, का बुवा ? तिला चुका करायची परवानगी नाहीच का? शहरी राजकारणात महिलांची अवस्था जास्त बिकट आहे. तिथे पक्षांतर अंकुशच हवा. म्हणूनच, महिला धोरण सर्व पक्षांना सक्तीचे करायला हवे.

'राजकारण बदलाया राजकारणात या' ही नीती मान्य असेल तर बाईला राजकारणात यायला, राजकारणाची पत वाढवायला व गरिबांचे प्रश्न सोडवायला कोण नाही म्हणेल? दोन पोरांना अर्धी- अर्धी भाकरी वाटून, उपाशी पोटी झोपणारी माय सत्तेत येतेय तर पोटदुखी कसली? या मूलभूत संवेदनेचा समाजाकडून आदर व्हायला हवा.

बाईने राजकारणात यावे म्हणून काय करावे? जशी घरात बाई दुय्यम तशी पक्ष महिला आघाडीही दुय्यम, हे कसं आणि कोण थोपवणार ? महिला आघाडीही महिलांबाबतच्या निर्णयात तरी पक्षात असते का? पॅरेंट कमिटी, तिकीट वाटप यंत्रणा व वित्त निर्णय यंत्रणा यात पक्षपातळीवर बाईचे स्थान काय? पक्षासाठी फंड जमवायची कला नसली तर तिने पक्ष निर्णयात येऊच नये का? यावर उपाय काय ? हे प्रश्न सुटायला हवेत.

महाराष्ट्रातील दीड लाख महिला स्थानिक स्वराज्य संस्थेत फक्त गप्प बसून राहतील काय? किंवा त्या राजकारण सोडून फक्त घरगुती गप्पा मारणार काय? नाही! त्यांना कायद्याने आरक्षण मिळाले तसे समाजाचे शहाणपण व पक्षाचे संरक्षण मिळाले तर या महिला पक्षातील गोंधळाचा माहोल बदलायला नक्की धजावतील.

राजकारणाची बदनामी थांबवायची तर महिलांची भागिदारी ही पुरुषांनी हिमतीने स्वीकारली पाहिजे.

पक्षांनीही महिलांना त्यांच्या निर्णयात घेतले पाहिजे. राजकारणातील महिलांची भागिदारी धारदार व्हायची तर पक्ष तिकीट कमिट्यांमध्येही त्यांना घ्यावे. तसेच पक्के वॉर्ड त्यांना देऊन जिंकल्यानंतर त्यांच्या कारभारात मदतीच्या नावाखाली मालकी दाखवता कामा नये!

कारभारातील व घरातील अशा दोन्ही ठिकाणची 'मालकी' बंद झाली पाहिजे. त्यासाठी युवतींनीही राजकारणात यावे, म्हणून राजकारणाची गोडी घराघरांत वाढायला हवी. 'राजकारण म्हणजे जनतेच्या भविष्याचे तारण' हे पटले पाहिजे. घराघरांत राजकारणाबद्दल प्रेमभाव निर्माण झाल्याशिवाय हा देश ताळ्यावर येणार नाही. मग आपल्याच पात्रतेचे आपल्याला उमेदवार मिळतात, त्यात चूक काय? महिला धोरणातून हा भाग सातत्याने, गांभीर्याने मांडत जायला हवा..

गप्पांचे विषय जसे घरगुती असतात, तसेच तरुण पिढी व महिलांनी राजकीय विषयदेखील बोलले पाहिजेत. स्वतः एक तरी सत्ताकेंद्र ताब्यात घेऊन, गरिबांचा मुद्दा लावून धरणारी 'ती' सत्ताधारी बनायला पाहिजे. जे जे आपल्याला राजकारणात जमणार नाही असे वाटते, ते ते करून पाहिले पाहिजे. पहिल्यांदा घोड्यावर बसताना एखादी महिला जखमी होईल, पडापडी होईल; परंतु सवय झाली की घोडा नक्की ताब्यात येईल. निवडणुकीत समाजाची व मतदारांची ही परीक्षाच असते. या बापड्यांचा अनुभव असा आहे की, 'पैसे घ्या मत द्या' ही पद्धत मतदारांच्या तोंडावर पाच वर्षांसाठी 'मूक-पट्टी' मारून टाकते ! एकदा मत विका व कायमचे तोंड बंद करा. महिला मतदार म्हणूनही तिचे स्वतंत्र अस्तित्व आज नाही.

'पैसा एकदा कमवा आणि पाच वर्षे अश्रू जमवा, दुःख व प्रश्न झेलत राहा' हे आता चालणार नाही. महिलांनी विकासाचा विडा उचलला आहे. मतदारांनीही काय करायचे, पक्ष व संघटनांनी त्यांची ताकद कशी वाढवायची, हा खरा पैजेचा विडा आहे!

'राजकारण बदलाया, राजकारणात या' ही एकलव्यी गर्जना कारभारणींनी केवळ आरक्षणाच्या माध्यमातून दिलेली नाही. तीही बॅ. नाथ पै यांच्या पठडीतील खरी सत्ताधारी बनू इच्छिते. ते म्हणतात, 'खरा सत्ताधारी कोण?' तर, 'जनतेच्या

पायात काटा रुतला तर, ज्याच्या डोळ्यांत अश्रू येतात, तो खरा सत्ताधारी!' आपली आई, बहीण, पत्नी सावित्री होऊ शकते; तर पुरुषांनी 'मॅडम डोईवर व आम्ही भुईवर' हा विचार झटकून टाकला पाहिजे. जोतिबांचा वारसा आपणही जपला पाहिजे ! स्त्री-पुरुष समानतेच्या विचाराचा समस्त पुरुषांनी न घाबरता स्वीकार केला पाहिजे. निवडणुकीतील महिला व वंचितांची भागीदारी वाढेल यासाठी नवे उपाय शोधले पाहिजेत.

निवडणूक ही महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे. निवडणूक व खासकरून 'बाजारू निवडणूक' ही महिलांच्या राजकीय भागीदारीतील मोठा अडथळा बनत चालली आहे. हे आव्हान पेलायचे तर महिला धोरणात 'महिलाकेंद्री निवडणूक सुधारणा' करण्याची खूप गरज आहे. लोकशाही व विकेंद्रीकरणाला कारभारणींमार्फत राजकीय न्याय मिळू शकतो. त्यासाठी हा मूलभूत विचार रुजायला हवा. कारण, समांतर सत्ताकेंद्राचा बागुलबुवा, बजेट वापराची भविष्यभीती, चारित्र्यहननाची प्रगती, पाच वर्षे कार्यकाळ असणाऱ्या कारभाराची विभागणी, बिनविरोध निवडणुका, खर्चीक निवडणुका व प्रशासकीय विरोधकांची अडथळा शर्यत, यातून महिलांची त्वरित सुटका व्हायलाच हवी. महिला धोरणाने हे सरंक्षण कवच दिलं तर कारभारणींचा आत्मविश्वास व कारभार खूप सुधारेल !

## महिलांसाठी नॅशनल पर्स्पेक्टिव्ह प्लॅन

केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या महिला व बाल विकास खात्यातर्फे नेमलेल्या एका अभ्यास गटाने महिलांसाठी 'यथार्थ दर्शक अहवाल (१९८८-२०००)' तयार केलेला आहे. युवक क्रीडा व महिला विकास खात्याच्या तत्कालीन केंद्रीय मंत्री मार्गारिट अल्वा यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी १९८७ मध्ये हा अभ्यास गट स्थापन करण्यात आला होता. या अभ्यास गटाने अत्यंत परिश्रम करून सदर अहवाल ९-१०-१९८८ रोजी प्रकाशित झाला आहे.

देशातील विकास योजनांचा महिलांवर, विशेषतः ग्रामीण महिलांवर, काय परिणाम झाला आहे, याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न या अहवालात केलेला आहे. तसेच महिलांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने काही कार्यप्रधान उपाययोजनाही सुचवल्या आहेत.

## राजकीय क्षेत्रातील सहयोग - शिफारशी

या शिफारशींपैकी १०.५ क्रमांकाची शिफारस आज मान्य झालेली आहे; परंतु अन्य शिफारशी आजही महत्त्वाच्या आहेत.

१०.१ औपचारिक तसेच अनौपचारिक राजकीय प्रक्रिया, तसेच सर्व पातळ्यांवरील निर्णय घेण्याच्या पदांवर स्त्रियांचे प्रतिनिधित्व अत्यंत अल्प प्रमाणात होत आहे. यासाठी सत्तेवर असलेल्या सर्व पुरुष व महिला यांना स्त्रियांच्या प्रश्नांविषयी संवेदनशील बनवण्याची शिफारस केलेली आहे.

१०.२ स्त्रियांना संघटित करून त्यांना आपल्या मागण्या एकत्रितपणे मांडण्यासाठी त्यावर योग्य कृती खात्रीपूर्वक करून घेण्यासाठी स्थानिक महिलांमधील नेतृत्वगुण ओळखून, त्यांना प्रशिक्षण देणे व संवेदनशील बनवणे आवश्यक आहे. प्रशिक्षक व सामाजिक कार्यकर्ते यांनी व्यक्तीतील परस्पर संपर्ककौशल्य विकसित करण्यावर विशेष लक्ष पुरवले पाहिजे.

१०.३ स्त्रियांमध्ये विशेषतः ग्रामीण भागांतील महिलांमध्ये त्यांच्या राजकीय हक्काविषयी व क्षमतेविषयी जागृती निर्माण केली पाहिजे. स्वेच्छेने काम करणाऱ्या संघटनांनादेखील या कामासाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

१०.४ (अ) स्त्रियांना त्यांचे मोल वाढवून, सुजाण नागरिक बनवण्यासाठी सर्व संचार माध्यमांची संपूर्ण क्षमता अत्यंत कल्पकतेने वापरली पाहिजे. याशिवाय, स्त्रियांकडे अंगभूत हक्कांनी परिपूर्ण अशी एक व्यक्ती या दृष्टीने पाहण्यासाठी नवीन सामाजिक मूल्ये व सामाजिक वृत्ती जोपासली पाहिजे.

१०.४ स्त्रियांची सर्व विधानमंडळांतील प्रशासन संस्था आणि सत्तास्थाने यातील प्रतिनिधित्वाची पातळी वाढवण्यासाठी, संक्रमण काळातील उपाययोजनांच्या स्वरूपात काही पावले उचलणे आवश्यक आहे. यासाठी स्त्रिया अधिक प्रमाणात शैक्षणिक व कामाविषयींच्या संधींचा लाभ घेण्यासाठी पुरुषांच्या बरोबरीने येत नाहीत, तोपर्यंत त्यांच्यासाठी जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे.

१०.५ सर्व पंचायत राज्य संस्थांमध्ये (गाव, गट व जिल्हा पातळीवरील) ३० टक्के जागा स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात याव्यात. नगरपालिकांमध्येही याच प्रकारे आरक्षण करावे. (ही मागणी पूर्ण झाली आहे. )

१०.६ राज्य सरकारातील मंत्रीमंडळात अधिक महिलांचा समावेश असणे आवश्यक आहे.

१०.७ स्त्रियांचा आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये अधिक परिणामकारक सहभाग व्हावा यासाठी सर्व प्रतिनिधी मंडळांत स्त्रियांना अधिक प्रतिनिधित्व मिळावे.

१०.८ राज्य नियोजन मंडळ व नियोजन आयोग यांवर महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे.

१०.९ सर्व विकास योजनांचा लाभ स्त्रियांपर्यंत समान पातळीवर व्हावा, यासाठी सर्व स्तरांतील योजनांच्या कर्मचाऱ्यांमध्ये ५० टक्के स्त्रिया असल्या पाहिजेत.

१०.१० कामगार संघटनांनी कार्यकारी समित्यांवर अधिक महिलांचा समावेश केला पाहिजे.

१०.११ सर्व राजकीय पक्षांनी आपल्या सर्व उमेदवारांपैकी ३० टक्के जागा महिलांना द्याव्यात, यासाठी त्यांना प्रेरित करावे / गळ घालावी.

१०.१२ स्त्रियांसाठी विधानमंडळे व लोकसभेमध्ये ३० टक्के जागांचे तात्पुरते आरक्षण ठेवावे (इ.स. २००० पर्यंत).

**राजसत्तेतील कारभारणींच्या व्यापक मागण्या व शिफारशी**

भारतात पुरोगामी महिला धोरण आणून शासन व स्त्री आंदोलनांनी फार मोठी मजल मारली, यात शंकाच नाही. महिलांना आरक्षण मिळाल्याने अक्षरशः लक्षावधी स्त्रिया राजकारणात उतरल्या आहेत; गावपातळीवर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांना अधिकार मिळाला आहे; तरीही कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवहारात स्त्रियांची समानता अजूनही दूरच आहे. 'स्त्रियांना सक्षम बनवले पाहिजे' ही बीजिंग परिषदेची घोषणा अजून काही प्रमाणात घोषणाच राहिली आहे. अजूनही महिलांच्या नजरेतून जग पाहिले जात नाही. म्हणूनच, महिलांच्या एकूण जबाबदाऱ्यांचा विचार करून सुधारणा केल्या पाहिजेत.

राजकीय सक्षमीकरणासह सर्वांगीण बदलाकरिता आम्ही पुढील शिफारशी करत आहोत :

## अ) पंचायत राज

१. देशातील सर्व राज्यांमध्ये पंचायत राज व्यवस्थेमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण हवे.

२. ७३ व्या घटनादुरुस्तीतील विकेंद्रीकरणाचे परिशिष्ट ११ पूर्णपणे २९ कामांसह हस्तांतरासह कार्यान्वित करावे.

३. सर्व वित्तीय आयोगांची देशभर त्वरित पाहणी करावी व ते जीवित करून कामाला लावावेत.

४. महिला ग्रामसभा व ग्रामसभा सक्षम आणि कार्यरत करण्यासाठी सरकारने यांचे वर्किंग मॅन्युअल तयार करून आवश्यक बजेटचीही व्यवस्था करावी.

५. महिला सरपंचांबरोबर, महिला ग्रामसेविका व महिला पोलीस पाटीलही गावोगावी नेमाव्यात.

६. नियमितपणे पंचायतींचे हिशेब ठेवण्यासाठी आणि तपासण्यासाठी सरकारने सूत्रबद्ध व कायदेशीर व्यवस्था करावी.

७. महिला सरपंचांना दहशत दाखवून काम करणाऱ्यांना कायदेशीर गुन्हेगार मानावे.

८. महिला लोकप्रतिनिधींना मोफत एसटी पासेस द्यावेत..

९. राजकारणात हिंसा व पैसा यांचे वर्चस्व कमी झाल्याखेरीज स्त्रियांना सुरक्षितपणे राज्य करता येणार नाही, म्हणून हे प्रकार रोखण्यास परिणामकारक सुधारित निवडणूक कायदा त्वरित निर्माण करावा.

१०. निरंतर प्रशिक्षणाकरिता 'गाव तिथं महिला भवन' व 'तालुका तिथं सरपंच भवन' बांधले जावे.

११. महिला सरपंचांचा बैठकभत्ता व मानधन, केरळ पॅटर्न आधारे निर्धारित करावा.

१२. महाराष्ट्राकरिता सर्वंकष 'महाराष्ट्र राज्य कारभारणी प्रशिक्षण व संरक्षण धोरण' तयार करून पुरोगामी राज्याची दृढता वाढवावी.

## ब) संसाधन आणि मालकी हक्क

१. राजकीय सक्षमीकरणासाठी अर्धांगीला अर्धा वाटा मिळाला पाहिजे. जगातील

निम्म्यापेक्षा अधिक संपत्ती निर्मितीत स्त्रीचा सहभाग आहे. भारतीय स्त्रीचा संपत्तीच्या निर्मितीत सहभाग असला तरी तिला संपत्तीत हिस्सा नाही. स्त्रीला न्याय देण्याच्या चळवळीत संपत्तीत हिस्सा मिळणे आवश्यक आहे. स्त्री, मग ती कोणत्याही जातीची, धर्माची किंवा वर्गाची असो; तिला संपत्तीत वाटा मिळालाच पाहिजे.

२. जमीन, जंगल, पाणी इत्यादीविषयक हक्क प्रदान करताना संबंधित हक्कपत्रात स्त्री आणि पुरुष दोघांच्या नावांची नोंद करावी. नैसर्गिक आणि इतर संसाधनांवर पुरुषांच्या बरोबरीने महिलांनाही मालकी हक्क व निर्णय-सहभाग हवा.

३. महिला उमेदवारांसाठी दारिद्र्यारेषेची व्याख्या केवळ आर्थिक उत्पन्नावर न ठरवता उत्पन्नाचे साधन, अवलंबित व्यक्ती, घराचा प्रकार, पाणी, वीज, शौचालये, निरक्षर व्यक्ती आणि सामाजिक स्तर यांप्रमाणे निश्चित व्हावी. सरकारने पुढाकार घेऊन महिला उमेदवारांकरिता दारिद्र्यारेषेची व्याख्या वास्तववादी करावी.

४. सामाजिक वनीकरण आणि पडीक जमीन विकासाच्या निर्णयातही स्त्रिया केंद्रस्थानी मानून कायदा करावा.

५. गावपातळीवरील पाण्याचे वाटप नेतृत्वक्षम महिलांच्या जबाबदार गटाकडे सोपवावे.

## क) शैक्षणिक स्थानिक स्वराज्य संस्था

१. ग्रामीण भागात अंगणवाडी व बालवाडी प्रशिक्षणाची पूर्ण सोय असावी.

२. अंगणवाडी आणि बालवाडी यांची संख्या आणि गुणवत्ता वाढवावी.

३. सर्व शाळांना जोडून पाळणाघरे असावीत.

४. प्रत्येक शाळेमध्ये मुलींसाठी पाणी आणि संडासची स्वतंत्र सोय असावी. बालमजुरांचे पुनर्वसन करताना त्यांच्यासाठी जेवण, कपड्यांची पर्यायी व्यवस्था करावी.

६. ग्रामीण मुलींसाठी तालुकापातळीवर तंत्रनिकेतन असावे.

७. दर पाच गावांत एक असे मुलींसाठी अनौपचारिक संवाद केंद्र व प्रशिक्षण केंद्र

असावे.

८. आदिवासी, भटक्या विमुक्त जमातींतील मुलींसाठी आश्रमशाळांची स्वतंत्र सोय उपलब्ध व्हावी.

९. शैक्षणिक आणि विकासाच्या सर्व संधी स्त्रियांना विशेषरूपाने मिळतात की नाही, याबाबत वार्षिक आढावा व्हावा.

१०. शिक्षण ही सरकारने आपली स्वतःची जबाबदारी मानून ते सार्वजनिक करावे.

११. तरुण मुली व महिला यांच्यासाठी सर्व शिक्षणसंस्थांमध्ये विशाखा समित्या असल्याच पाहिजेत.

## (ड) कौटुंबिक, सामाजिक आणि कायदेविषयक

१. ग्रामपंचायतीसमवेत परित्यक्त्यांच्या पुनर्वसनासाठी विशेष योजना तयार कराव्यात आणि तालुकापातळीवर शासकीय आधारगृहे स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सुरू करावीत.

२. अवैध दारू आणि इतर अमली पदार्थांच्या निर्मितीला आणि उपभोगाला ग्रामपंचायतींतून संपूर्ण बंदी आणावी.

३. कारभारणींच्या साहाय्याने सर्व जिल्ह्यांमध्ये कुटुंब न्यायालये सुरू व्हावीत आणि एक वर्षाच्या आत खटल्याचा निर्णय लागावा.

४. कुटुंबांतर्गत छळ, हिंसाचार आणि बलात्कार या केसेसमध्ये आरोपीस अटकपूर्व जामिनाची तरतूद नसावी.

५. परित्यक्ता स्त्रियांचा बेघरांत समावेश करून एकट्या स्त्रियांना घरे मिळावीत. जमीन आणि कर्ज वाटप यातही अग्रक्रम मिळावा.

६. एसटीमध्ये पुढील जागा स्त्रियांसाठी राखीव असाव्यात. रात्री एसटीमधील दिवे बंद न करता मंद ठेवावेत.

७. वस्ती ते गावपातळीवर मुली व महिलांसाठीही वाचनालये आणि व्यायामशाळा असाव्यात.

## इ) सेवाहक्क व माहितीचा अधिकार

१. महिला कारभारणींना आवश्यक ती माहिती व सेवाहक्क जवळच्या शासकीय, निमशासकीय कार्यालयात विनासायास मिळायला हवेत.

२. ग्रामीण महिलांची कल्याण करणारी परिपत्रके, ठराव, शासकीय आदेश यांच्या प्रती, झेरॉक्स योग्य मूल्य देऊन त्वरित मिळाव्यात.

३. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांनी केलेले ठराव, खर्च केलेल्या रकमा, आखलेल्या योजना, योजनांची अंमलबजावणी, अर्थसंकल्प यासंबंधात गावातील लोकांनी मागणी केल्यास ती त्वरित उपलब्ध करून द्यावी अथवा कार्यालयात ती माहिती निरीक्षणासाठी खुली ठेवावी.

**आम्ही तीन गोष्टी आजही शिकतो आहोत :**

१. पायाभूत नियोजन कसे करावे, यात महिला आल्या की गुणात्मक फरक पडतो.

२. सामान्य माणसाला संवेदनशील कार्यकर्ता व कार्यकर्ती कसे तयार करावे, हे पंचायत राज शिकवते.

३. कार्यक्रमांमधून धोरणाला कसे हलवावे, हे गाव मंत्रालये सांगतात. त्यांचा आवाज ऐकला पाहिजे.

लोक व लोकशाही आधारित महिला धोरणे बळकट कशी करायची, हेही मनामनांत डोकावून समजून घ्यायला हवीत. आम्हांला सर्व सत्य उमगलेले नाही. सत्य समजण्याच्या प्रयत्नांत एक पोकळी वाट पाहतेच आहे. एका गोष्टीतल्या गर्विष्ठ विद्वानाच्या गुर्मीची आम्ही जाण ठेवून आहोत.

सर्व ज्ञान प्राप्त झाल्याच्या गुर्मीत तो विद्वान दुनियाभर शेखी मिरवतो. परंतु एका राजदरबारात त्याला स्वतःचे भान येते. तिथला राजा एका पाण्याने भरलेल्या पेल्यात दूध ओतू लागताच, विद्वान अस्वस्थ होतो. तो म्हणतो, 'पेल्यात रिकामी जागाच नाही, तर हे दूध बाहेरच पडणार!' राजा म्हणतो, 'म्हणूनच मी स्वतःला सर्वज्ञानी मानत नाही!' विद्वानाच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडतो! त्याची सर्वज्ञानी अहंता खाडकन उतरते.

या गोष्टीतल्या ज्ञानपुरुषाचे भान ठेवून महिला प्रश्नांकरिता व्यासपीठ तयार करणारे व चौकटी मोडणाऱ्या बंडखोरांना महिला धोरणाची जागा निर्माण करत आहोत. या मार्गात प्रस्थापित, परंपरावादी शक्तींना चोख उत्तर द्यायचे तर महिला धोरणाची तळातली ताकद बळकट करावी लागेल. तळातील वेदना ही धोरणाची प्रेरणा झाली, तरच शोषित, दलित व वंचित महिलांचा आवाज हाच सत्ताधारी जरब

निर्माण करू शकेल!

आजपर्यंत मोठ्या प्रमाणात डावलले गेलेल्या या अर्ध्या लोकसंख्येला, सर्व सत्ताकेंद्रात सत्ता भागिदारीची महिला राष्ट्रीय रणनीती आखावीच लागेल. त्याकरिता महिलांना विधानसभेत व लोकसभेत किमान ३३ टक्के आरक्षण द्यायलाच हवे. शिवाय, व्यापक सत्ता भागिदारीचे राष्ट्रीय धोरणही तयार ठेवावे लागेल.

थोडक्यात, महिला धोरणाने महिलांची स्थिती नक्की बदलली आहे; परंतु पूर्ण समानता बाकी आहे.

**संदर्भ**


१. युरोपीयन युनियन अहवाल (२०१५)

२. महिला धोरण (१९९४, २०१४ व मसुदा २०१२)

३. राजसत्तेतल्या कारभारणी (२००१ ते २०१९)

४. सरपंचांच्या धैर्यगाथा (लोकसत्ता, चतुरंग मालिका २०२०)

५. महिलांसाठी राष्ट्रीय यथार्थ दर्शक योजना (१९८८-२०००)



**साभार:**

धोरण कुठवर आलं ग बाई!

संपादन: संध्या नरे-पवार



**-भीम रास्कर**

संचालक, आरएससीडी

महिला राजसत्ता आंदोलनाचे सह-संस्थापक,

स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशिक्षण व

सक्षमीकरणासाठी कार्यरत

मोबाईल: ९८६९२५९१९४

bhim.rscd@gmail.com